**नि.फौ.केस क्रमांकः १/२०२१**
**महाराष्ट्र शासन ..वि.. ज्ञानेश्वर भुते**
**निशाणी क्रमांकः- २४**

साक्षीदार क्रमांक **५** अभियोग पक्षाकरीता
शपथेवर बयाण देतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | **–** | **श्रावण तुकाराम शहारे,** |
| वय | - | ४८ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | सरांडी बुज, ता. लाखांदुर, जि. भंडारा. |

**सरतपास – श्रीमती ए. सी. बुराडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत शपथेवर सुरू–**

१. पोलीसांनी मला दिनांक ०३.०६.२०२० रोजी घोरमोडेच्या घराच्या मागील खुल्या मैदानावर फोन करुन बोलावीले होते. मी तंटामुक्त असल्यामुळे मला बोलावीले होते. पोलीसांनी तो कागद लिहीला, मला वाचण्यासाठी दिला व सही करण्यासाठी सांगीतले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवीण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २५** देण्यात येते. त्यानंतर मी घरी गेलो.

२. परत दुसऱ्या दिवशी मला पोलीसांनी तिथेच फोन करुन बोलावीले होते. पोलीसांनी भुतेकडुन कुऱ्हाड मागीतली. मी सही केली. आता मला जप्ती पंचनामा दाखवीण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २६** देण्यात येते. जप्त केलेली कुऱ्हाड आज रोजी मला दाखवील्यास मी ओळखु शकत नाही.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकिल श्री. एम.पी. राऊत यांचे मार्फत –</u>**

३.     मी मौजा सरांडी येथील तंटामुक्ती अध्यक्ष चार ते पाच वर्ष होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तंटामुक्ती अध्यक्ष असल्यामुळे माझी पोलीसांसोबत ओळख झाली होती व पोलीस गावामध्ये यायचे त्यावेळी मला बोलवायचे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व फिर्यादी यांचे वाद आमचे तंटामुक्ती समितीकडे देखील आले होते. त्यावेळेस मी तंटामुक्ती अध्यक्ष होतो परंतु त्यामध्ये काय निर्णय झाला हे मला माहित नाही.

४.     पोलीसांनी माझ्या पहिल्या दिवशी दोन सह्या घेतल्या व दुसऱ्या दिवशी एक सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, मी कामामध्येच होतो त्यामुळे मला घटनास्थळी जाण्यामध्ये उशीर झाला तोपर्यंत सर्व लिखापढी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही दिवस पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही, मी फक्त सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी तंटामुक्ती अध्यक्ष असल्यामुळे सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यांमध्ये पोलीसांनी काय लिहीले हे मी वाचले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**
**<u>फेरतपास - नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAVIN PRABHULAL YADAV
Date: 2026.04.23 16:45:41 +0530

दिनांकः-२३/०४/२०२६

**( प्रविण पी. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी लाखांदूर